MHPU170013982020

| | |
|---|---|
| दाखल तारीख | :– दि.०७/१०/२०२० |
| नोंदणी तारीख | :– दि.०७/१०/२०२० |
| निकाल तारीख | :– दि.२४/०६/२०२६ |
| कालावधी | :– ०५ व. ०८ म. १७ दि. |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, इंदापूर, जि. पुणे यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी एम. एच. फारुकी)

**संफौ ख. क्र. ६९१/२०२०** **निशाणी क्र.११ लगत**

| | |
|---|---|
| **महाराष्ट्र सरकार द्वारा**<br>इंदापूर पोलिस स्टेशन, इंदापूर<br>ता. इंदापूर, जि. पुणे. | ..... **अभियोग पक्ष** |
| **–विरुध्द–** | |
| **सचिन मोहन घोडके**<br>वय : २८ वर्ष, व्यवसाय : शेती,<br>रा. वरकुटे बु , ता. इंदापूर, जि.पुणे. | .... **आरोपी** |

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ०३/१२/२०१९ |
| पहिली खबर तारीख | ०३/१२/२०१९ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०७/१०/२०२० |
| गुन्हयाचे विवरण ठेवल्याची तारीख | ०७/०५/२०२६ |
| पुराव्याला लागल्याची तारीख | ०४/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयास राखीव तारीख | -------- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४/०६/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -------- |

### आरोपीची माहिती

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | शिक्षेस पात्र किंवा निर्दोष | शिक्षाधिन बंदीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | UTP |
|---|---|---|---|---|---|
| सचिन मोहन घोडके | ०६/१२/१९ | ०६/१२/१९ | भा.दं.वि. कलम २७९, ३३७, ३३८,४२७ तसेच मो. वा. अधि. कलम १८४, १३४ /१७७, १९६, २०५अ,/१७७ | निर्दोष | -- |

## सरकारी साक्षीदारांची यादी

| अनु.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर मल्हारी मारकड | ११ लगत | फिर्यादी |
| २. | चंद्रकांत तात्याबा मारकड | ११ लगत | साक्षीदार |
| ३. | पांडुरंग केसु मारकड | ११ लगत | साक्षीदार |
| ४. | महादु केसु मारकड | ११ लगत | साक्षीदार |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | ११ | गुन्ह्याचे विवरण |
| २. | ११ लगत | आरोपीचे निवेदन |

## भौतीक वस्तू

| अनु.क्र. | साहित्य नंबर | वर्णन |
| --- | --- | --- |
| -- | -- | -- |

**आरोप:- भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ व ४२७, तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४, १३४/१७७, १९६, सह कलम १७७ अन्वये.**

सुविद्य सहा. सरकारी अभियोक्ता :- श्री. एम. डी. करे

बचाव तथा आरोपी पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ :- श्री.एन.आर.कदम

## न्यायनिर्णय

(दिनांक २४ जुन, २०२६ ला घोषित)

१. सदरची केस आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, २७९, ३३७, ३३८ व ४२७ तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम तसेच मो. वा. अधि. कलम १८४, १३४ /१७७, १९६ सह कलम ७७ अन्वयेच्या गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे-**

२. दि.१३/१२/२०१९ रोजी रात्री ०२.३० वा. चे सुमारास फिर्यादी घरी झोपेत असताना त्यांचा भाऊ चंद्रकांत तात्याबा मारकड याने फोनद्वारे कळविले की, ''सचिन मोहन घोडके, तात्याबा केसु मारकड, पांडुरंग केरा मारकड, धोंडीबा लक्ष्मण देवकर असे दत्ता पांडुरंग मारकड यांचे राहते घरी चावलेल्या सापाला घेऊन पुढील औषधोपचारकामी इनामदार हॉस्पिटल अकलुज येथे बेझा कार नं एम.एच.४२एएस९२२२ मध्ये घेवुन जात असताना इंदापुर-अकलुज रोडने सराटी येथील जिजामाता पेट्रोलपंप येथुन पुढे अकलुज बाजुला जात असताना गाडी रस्त्यावरील खड्ड्यात अचानक आदळल्याने त्यांचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने गाडी भरधाव वेगात रस्त्याचे बाजुला असलेल्या बाभळीच्या व लिंबाच्या झाडाला आदळून गाडीतील प्रवासी दरवाजा आपोआप उघडुन रस्त्यावर आदळल्याने अपघात होवुन त्यांचे चुलते तात्याबा केसु मारकड यांचे डोक्याला पाठीमागचे बाजुस मार लागुन ते जागीच मयत झाले असुन चालकासह इतर तीन प्रवाशांना गंभीर व किरकोळ दुखापती झाल्या आहेत.'' त्यानंतर फिर्यादी व त्यांचे नातेवाईक तात्काळ घटनास्थळी पोहचुन त्यातील जखमींना

इनामदार हॉस्पिटल अकलुज येथे व त्यातील मयतास उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय इंदापुर येथे घेवुन आले. इंदापुर येथील डॉक्टरांनी त्यास मयत घोषित केले. सदरचा अपघात चालक सचिन घोडकेचा गाडीवरील ताबा सुटल्याने झाला आहे. अशाप्रकारे चालकाने सदरची गाडी भरधाव वेगात अविचाराने हयगयीने रस्त्याचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन लाल रंगाच्या ब्रेझा कार नं एम.एच.४२एएस ९२२२ चे नुकसाणीस कारणीभुत झाला म्हणुन त्यांचे विरुद्ध फिर्यादीने कायदेशीर फिर्याद दिली.

३. खबरीच्या आधारे इंदापूर पोलीस स्टेशन येथे अपराध क्र.६६७/२०१९ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासीक अंमलदार सहा. पोलीस फौजदारी श्री. ए.बी.जाधव यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करीत आरोपी विरुध्द अंतिम अहवाल या न्यायालयासमोर सादर केला.

४. नि.क्र.११ वर आरोपीविरूध्द गुन्ह्याचे विवरणपत्र तयार करण्यात आले व ते आरोपीस समजावून सांगितले असता त्याने निशाणी क्र.११ वरील निवेदनान्वये गुन्हा नाकबूल करून केस चालविण्याची विनंती केली.

५. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षाने वरील नमुद एकूण ०४ साक्षीदार यांचा तोंडी पुरावा या न्यायालयासमोर सादर केला. अभियोग पक्षाच्या पुराव्यांती आरोपीचे स्पष्टीकरणात्मक फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ च्या कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. त्यानंतर संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यांत मी सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एम. डी. करे यांचा युक्तिवाद ऐकला आणि बचाव पक्षातर्फे आरोपीचे सुविद्य विधीज्ञ श्री. एन.आर.कदम यांचा युक्तिवाद ऐकला.

७. या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उदभवलेत. या प्रश्नांना मी, त्याखालील नमुद कारणमीमांसेच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध पुराव्याचे आधारे, आज रोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | तुम्ही आरोपी दिनांक ०३/१२/२०१९ रोजी ०२.३० वाजताच्या सुमारास मौजे सराटी, ता. इंदापूर, जि. पुणे येथील जिजामाता पेट्रोलपंपजवळ इंदापूर–अकलुज रोडवर तुमच्या ताब्यातील मारुती सुझुकी कंपनीची ब्रेझा कार क्र. एम.एच.४२–ए.एस.९२२२ ही रहदारीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणाने मानवी जीवाला धोका होईल किंवा हानी पोहचेल किंवा जखम होण्याची शक्यता होईल असे चालवित असतांना स्वतःचा सदर गाडीवरुन नियंत्रण सुटून गाडी रस्त्याच्या बाजुला असलेल्या बाभळी व लिंबाचे झाडांना आदळून गाडीतील प्रवाशी दरवाजा आपोआप उघडून रस्त्यावर आदळून अपघात घडवून त्यामध्ये सदर कारमधील प्रवाशी तात्याबा केसू मारकड यांचा जागीच मृत्यू होण्यास तसेच धोंडीबा लक्ष्मण देवकर व तुम्हा आरोपीस स्वतःला गंभीर व किरकोळ दुखापती होण्यास तसेच सदर वाहनाचे रक्कम रु.५०/– पेक्षा अधिक रक्कमेचे नुकसान होण्यास कारणाभुत ठरलात, तसेच सदर वाहन भरवेगात व जनसामान्याच्या जिवीतास धोका होईल अशा परिस्थीतीत चालवित असतांना तसेच सदरचे वाहन आवश्यकता पुर्ण करणारे विमापत्र अंमलात असल्याशिवाय तिचा वापर करीत असतांना आढळुन आलात, तसेच जखमीस वैद्यकीय सेवा न पुरविली नाही तसेच जवळच्या पोलीस ठाण्यास घटनेची खबर न देताच घटनास्थळावरुन निघुन गेलात, म्हणुन तुम्ही भा.द.वि. चे कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८ व ४२७ तसेच मोटर वाहन कायदा कलम १८४, १३४, १९६ सह कलम १७७ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय? | **नाही.** |
| २) | काय आदेश? | **आरोपी दोषमुक्त** |

## !! का र ण मी मां सा !!

८. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षाने वरील नमूद केल्याप्रमाणे ०४ साक्षीदारांचा तोंडी पुरावा या न्यायालयासमोर सादर केला. त्याउलट बचाव पक्षाने कोठलाही शाब्दिक वा

कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबत:</u>**

**९.** साक्षीदार क्र.१ ज्ञानेश्वर मल्हारी मारकडे यांचे साक्षीत असे आले आहे की, मयत तात्याबा केसू मारकड हे त्यांचे चुलते होते. ते आरोपीस ओळखतात कारण तो त्यांच्या गावातील रहिवाशी असून मित्र आहे. घटनेबाबत आता त्यांना आठवत नाही. घटनेच्या दिवशी ते घरी होते त्यामुळे घटना कधी, कोठे व कशी घडली याबाबत त्यांना काहीही माहिती नाही. त्यांनी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. त्यांना अभिलेखावरील दिनांक ०३/१२/२०१९ रोजीची फिर्याद व प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आले, त्यावरील सही मान्य केली परंतू त्यातील मजकुराबाबत माहीत नसल्याचे सांगितले आहे. त्यांचे चुलते तात्याबा केसू मारकड हे कशामुळे मयत झाले याबाबत त्यांना काहीही माहिती नाही कारण पोलीसांनी त्यावर केवळ सही घेतली होती. सदर साक्षीदारास अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन सदर साक्षीदारास विद्वान सरकारी वकीलांच्या केलेल्या सुचक प्रश्नांची नकारात्मक उत्तरे दिली. परंतू सदर साक्षीदाराने असे मान्य केले की, आरोपी व त्यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे.

**१०.** साक्षीदार क्र. २ ते ४ यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, ते आरोपीस ओळखतात कारण तो त्यांच्या गावातील रहीवासी आहे व मित्र ही आहे. तसेच घटनेबाबत त्यांना काहीही आठवत नाही. घटनेदिवशी ते घरी असल्यामुळे घटना कधी, कोठे व कशी घडली याबाबत माहिती नसल्याचे सांगितले आहे. मयताचा मृत्यु कशामुळे झाला याबाबत काही माहिती नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदारांस अभियोग पक्षातर्फे फितूर घोषीत करुन सदर साक्षीदारास विद्वान सरकारी वकीलांच्या केलेल्या सुचक प्रश्नांची नकारात्मक उत्तरे दिली. परंतू सदर साक्षीदारांनी असे मान्य केले की, आरोपी व त्यांच्यात न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे.

**११.** आरोपी पक्षातर्फे नि.क्र.१६ वरील घटनास्थळ पंचनामा तसेच नि.क्र.१७ वरील एन्क्वेस्ट पंचनामा व नि.क्र.१८ शवविच्छेदन अहवाल हे मान्य करण्यात आले. परंतु, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ ते ४ हे अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नसल्याने त्यास महत्व राहत नाही.

**१२.** स्वतः फिर्यादी व साक्षीदार हे अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा न देणे यामुळे

आरोपीविरूद्ध दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे, की, घटनेच्या वेळी घटनास्थळी आरोपीने त्याच्या ताब्यातील बेझा कार नं एम.एच.४२एएस९२२२ ही बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणाने मानवी जीवाला धोका होईल किंवा हानी पोहचेल किंवा जखम होण्याची शक्यता होईल असे गाडी भरधाव वेगात चालवून अचनाकपणे गाडी खड्डयात घालुन गाडीवरील नियंत्रण सुटल्याने रस्त्याचे बाजुला असलेल्या बाभळीच्या व लिंबाच्या झाडाला आदळून गाडीतील प्रवासी दरवाजा आपोआप उघडुन रस्त्यावर आदळल्याने अपघात होवुन त्यांचे चुलते तात्याबा केसु मारकड यांचे डोक्याला पाठीमागचे बाजुस मार लागुन ते जागीच मयत होण्यास कारणीभूत होण्यास तसेच सदर गाडीचे रक्कम रु. ५०/–च्या अधिक रक्कमेचे नुकसान होण्यास आणि आरोपी हा नमुद वाहन हे भरवेगात व जनसामान्याच्या जीवीतास धोका होईल अशा परिस्थीतीत चालवित असतांना आढळून आला हे गुन्हे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत:–</u>**

**१३.** वरील चर्चेवरून असे स्पष्ट होते की, एकतर साक्षीदार क्र. १ ते ४ यांनी आपल्या साक्षीमध्ये जे सांगीतले ते कथन खोटे आहे किंवा त्यांनी पोलीसांसमक्ष दिलेले जबाब खोटे आहे. सामान्य परिस्थीती मध्ये साक्षीदारांनी असे केल्यावर त्यांच्यावर कोर्टात खोटी साक्ष देण्याचा गुन्हासाठी कार्यवाही झाली असती परंतु, निशाणी क्र.१५ वर तडजोड पुरसीसदेखील दाखल करण्यात आली व त्यात फिर्यादी व साक्षीदार क्र.२ ते ४ यांनी असे मान्य केली आहे की, आरोपी व सदर साक्षीदार यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे व त्यामुळे सदर साक्षीदारांची आरोपीविरूध्द कोणतीही तक्रार नाही. सबब, मी सदर साक्षीदारांना खोटी साक्ष देण्याचे गुन्हयासाठी जबाबदार धरत नाही. अशाप्रकारे, आरोपी सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब मुददा क्रमांक २ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>– आ दे श –</u>

१. आरोपी सचिन मोहन घोडके यास फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम २५५ (१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम २७९, ३३७, ३३८ व ४२७ तसेच मोटार वाहन अधिनियमाचे कलम १८४,१३४/१७७, १९६ सह कलम १७७ अन्वये दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त

करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये पुर्तता करणेकामी त्याचे स्वबंधपत्र रूपये १५,०००/– रुपये इतके दिले.

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2026.06.24 18:47:53 +0530

(**एम. एच. फारुकी**)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, इंदापूर,
ता. इंदापूर, जि. पुणे.

दिनांक: २४/०६/२०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | Smt. P. D. Kadam (Stenographer-3) |
| Court Name | :- | Shri. M.H. Farooqui, J.M.F.C., Indapur, Dist. Pune. |
| Date | :- | 24/06/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 24/06/2026 |
| Order uploaded on | :- | 24/06/2026 |